# धुळे महानगरपालिका,धुळे

मा.आयुक्त तथा प्रशासक
नगरसचिव कार्यालय

---

## प्रशासकीय महासभा क्रमांक ३०

---

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सर्वसाधारण महासभेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणेसाठी **सोमवार दिनांक ०२/०२/२०२६ सकाळी १०-०० वाजता स्व.दिलीप पायगुडे सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्री नितीन कापडणीस यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. सदर बैठकीचे इतिवृत्त

सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्री. नितीन कापडणीस | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | श्री. हेमंत निकम | उपायुक्त |
| ३. | स्वालिहा मालगावे | उपायुक्त |
| ४. | श्री राजेंद्र माईनकर | सहा. आयुक्त |
| ५. | श्री सागर जकातदार | सहा. आयुक्त |
| ६. | श्री. बाळासाहेब तट्टू | मुख्य लेखाधिकारी |
| ७. | श्री. सुनिलकुमार सुर्यवंशी | उपमुख्य लेखापरिक्षक |
| ८. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| ९. | श्री.नवनीत सोनवणे | कार्यकारी अभियंता पा.पू.वि. |
| १०. | श्री चंद्रकांत उगले | उपअभियंता बांधकाम |
| ११. | श्री. वर्षा घुगरी | कार्य.अभियंता स्थापत्य विभाग |
| १२. | श्री पराग ठाकरे | कनिष्ठ अभियंता विद्युत |
| १३. | श्री प्रकाश सोनवणे | उप अभियंता नगररचना |
| १४. | श्री. चंद्रकांत मोरे | उप लेखापाल |
| १५. | श्री.लक्ष्मण पाटील | मुख्य स्वच्छता निरिक्षक |
| १६. | श्री राजेश वसावे | मुख्य स्वच्छता निरिक्षक |
| १७. | श्री कमलेश सोनवणे | सहा. अभि. नगररचना विभाग |
| १८. | श्री हेमंत पावटे | सहा. अभि. नगररचना विभाग |
| १९. | श्री. दुष्यंत महाजन | अग्निशमन विभाग |
| २०. | श्री.अरुण चौधरी | मनपा शिक्षण मंडळ |
| २१. | श्री.प्रसाद जाधव | अतिक्रमण विभागप्रमुख |
| २२. | श्री रविकिरण पाटकरी | वृक्ष विभाग प्रमुख |
| २३. | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेखापाल |
| २४. | श्री बसीत पठान | सिस्टीम मॅनेजर |
| २५. | अनिल भडागे | वाहन विभाग |

मा.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

**मा.प्रशासक:-** आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे.

विषय क्रमांक:-२३१ मागील प्रशासकीय महासभा क्र.२९ चे इतिवृत्त वाचून कायम करणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक २३१ दिनांक ०२/०२/२०२५**

मागील प्रशासकीय महासभा क्रमांक २९ दिनांक १०/१२/२०२५ च्या सभेतील धुळे मनपा प्रशासक ठराव क्रमांक २१८ ते २३० अखेर क्रमश:वाचून कायम करण्यास वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी. **सही/- x x x**

**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-२३२ सहाय्यक संचालक नगररचना कार्यालयासाठी जुनी महानगरपालिकेतील कार्यालयाची जागा भाडेतत्वावर दिलेल्या जागेस मुदतवाढ देण्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक आवश्यक माहिती उपलब्ध नसल्याने सदरचा विषय तहकूब ठेवण्यात येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक २३२ दिनांक ०२/०२/२०२५**

सहाय्यक संचालक नगररचना कार्यालयासाठी जुनी महानगरपालिकेतील कार्यालयाची जागा भाडेतत्वावर दिलेल्या जागेस मुदतवाढ देण्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे कामी विषय मे. महासभेपुढे सादर झाला असता, सदर प्रस्तावाबाबत आवश्यक तपशील तथा माहिती उपलब्ध न झाल्याने सदर प्रस्ताव तहकूब ठेवण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी. **सही/- x x x**

**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-२३३ मौजे नगांव गट.क्र.३०६/२ क्षेत्र ०.८१ हे.आर श्री.विजय विनायक पाटील यांच्या मालकीची असून या शेतजमिनी वर धुळे महानगरपालिका कडून शॉपिंग कॉमप्लेस व भाजीपाला मार्केट या आरक्षण वगळणेबाबत शासनास अहवाल सादर करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक २३३ दिनांक ०२/०२/२०२५**

मौजे नगांव गट.क्र.306/2 क्षेत्र 0.81 हे.आर श्री.विजय विनायक पाटील यांच्या मालकीची असून या शेतजमिनी वर धुळे महानगरपालिका कडून शॉपिंग कॉमप्लेस व भाजीपाला मार्केट या आरक्षणाने आरक्षित केली आहे. व तसेच सदर शेत मालकांनी हरकत घेतलेली आहे हरकत क्र.431 आहे.

तसेच उक्त शेतजमिनिपासून धुळे शहर अर्धा कि.मी अंतरावर भाजी मार्केट व शॉपिंग कॉमप्लेस आहे. व तसेच नगांव गाव देखील जवळ असल्याने तेथे देखील भाजी मार्केट व शॉपिंग कॉमप्लेस त्यामुळे सदरील शेतजमिनीवर कोणतेही भाजी मार्केट व शॉपिंग कॉमप्लेस बांधण्याची आवश्यकता भासत नाही व त्यामुळे श्री. विजय विनायक पाटील यांच्या

मालकीची शेती गट क्र. 306/2 क्षेत्र 0.81 हे आर शेतजमीन रहिवास प्रयोजनासाठी खुली करण्यात यावी. असे मा. आमदार राघवेंद्र (राम) मनोहर भदाणे यांनी विनंती केली आहे.

त्यानुषंगाने सदर जागेचा 7/12 उताराचे अवलोकन केले असता उक्त जागेची मालकीचा 7/12 उतारा "विजय विनायक पाटील" या नावाने दिसून येत आहे तसेच नगरभूमापन कार्यालयाचा मोजणी नकाशा सादर केला नसल्याने मौजे नगांव गट.क्र.306/2 क्षेत्र 0.81 हे.चे संपूर्ण क्षेत्र विचारात घेऊन सदर क्षेत्र शासन नगरविकास विभागाकडील निर्णय क्र.धुमपा-2011/प्र.क्र.504 (भाग-1)/नवि-25 दि.05/1/01/2018 अन्वये महानगरपालिका हद्दीलगतचे 11 "गावांचा धुळे महानगरपालिका हद्दीत समावेश करण्यात आलेला आहे.मौजे नगांव या गावातील" जमिनी महानगरपालिका हद्दीत समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

उक्त वाढीव हद्दीचा विकास योजना आराखडा तयार करू महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 चे कलम 26 (1) अन्वये दि.15/05/2025 रोजीच्या राजपत्रात तसेच स्थानिक वृत्तपत्रात जाहीर सूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यात मौजे नगांव गट.क्र.303/2/ब हि मिळकतीचे काही क्षेत्र "SHOPPING CENTER" व "VEGETABLE MARKET" या आरक्षणाने बाधित आहे.

तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 28 (4) नुसार सदर जागा हि "SHOPPING CENTER" व "VEGETABLE MARKET" या प्रस्तावासाठी आरक्षित करून सदर प्रस्ताव शासनास अंतिम मंजुरीसाठी सादर करणेत आलेला आहे.

त्यामुळे सदरबाबत शासनस्तरावरून आरक्षण वगळणेबाबत धोरणात्मक निर्णयासाठी सदर विषय मे. महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, मौजे नगांव गट.क्र.३०६/२ क्षेत्र ०.८१ हे.आर श्री.विजय विनायक पाटील यांच्या मालकीची असून यावरील प्रस्तावित शॉपिंग कॉमप्लेस व भाजीपाला मार्केट हे आरक्षण वगळण्यात व त्यानुसार आवश्यक कार्यवाही करण्यासाठी शासनास अहवाल सादर करणेस वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-२३४ मौजे नगांव गट.क्र.३०३/२/ब क्षेत्र १.०० हे.आर श्री.भरत वना पाटील यांच्या मालकीची असून या शेतजमिनी वर धुळे महानगरपालिका कडून प्लेग्राउंडसाठी असलेल्या आरक्षण वगळणेबाबत शासनास अहवाल सादर करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक २३४ दिनांक ०२/०२/२०२५**

मौजे नगांव गट.क्र.303/2/ब क्षेत्र 1.00 हे.आर श्री.भरत वना पाटील यांच्या मालकीची असून या शेतजमिनी वर धुळे महानगरपालिका कडून प्लेग्राउंडसाठी आरक्षित केली आहे. व तसेच सदर शेत मालकांनी हरकत घेतलेली आहे हरकत क्र.562 आहे.

तसेच उक्त शेतजमिनिपासून पोदार स्कूलचे मोठे मैदान आहे व तसेच जवळच अजमेर कॉलेजचे मैदान आहे. व तसेच नगांव येथे विविध शिक्षणिक संकुल आहेत तेथे देखील मैदान उपलब्ध आहेत त्यामुळे सदरील शेतजमिनीवर कोणतेही प्लेग्राउंड आवशकता भासत नाही व त्यामुळे श्री.भारत वना पाटील यांच्या मालकीची शेती गट क्र. 303/2/ब क्षेत्र 1 .00 हे आर शेतजमीन रहिवास प्रयोजनासाठी खुली करण्यात यावी. असे मा. आमदार राघवेंद्र (राम) मनोहर भदाणे यांनी विनंती केली आहे.

त्यानुषंगाने सदर जागेचा 7/12 उताराचे अवलोकन केले असता उक्त जागेची मालकीचा 7/12 उतारा बंद दिसून येत आहे व सदर जागेची मालकी हि इतर अधिकार " गोपाल हरीकिसनजी चांडक" या नावाने दिसून येत आहे तसेच नगरभूमापन कार्यालयाचा मोजणी नकाशा सादर केला नसल्याने मौजे नगांव गट.क्र.303/2/ब क्षेत्र 1.00 चे संपूर्ण क्षेत्र विचारात घेऊन सदर क्षेत्र शासन नगरविकास विभागाकडील निर्णय क्र.धुमपा-2011/प्र.क्र.504 (भाग-1)/नवि-25 दि.05/1/01/2018 अन्वये महानगरपालिका हद्दीलगतचे 11 "गावांचा धुळे महानगरपालिका हद्दीत समावेश करण्यात आलेला आहे.मौजे नगांव या गावातील" जमिनी महानगरपालिका हद्दीत समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

उक्त वाढीव हद्दीचा विकास योजना आराखडा तयार करू महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 चे कलम 26 (1) अन्वये दि.15/05/2025 रोजीच्या राजपत्रात तसेच स्थानिक वृत्तपत्रात जाहीर सूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यात मौजे नगांव गट.क्र.303/2/ब हि मिळकतीचे काही क्षेत्र "PLAY GROUND" या आरक्षणाने बाधित आहे.

तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 28 (4) नुसार सदर जागा हि "PLAY GROUND" या प्रस्तावासाठी आरक्षित करून सदर प्रस्ताव शासनास अंतिम मंजुरीसाठी सादर करणेत आलेला आहे.

त्यामुळे सदरबाबत शासनस्तरावरून आरक्षण वगळणेबाबत धोरणात्मक निर्णयासाठी सदर विषय मे. महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, मौजे नगांव गट.क्र.३०३/२/ब क्षेत्र १.०० हे.आर श्री.भरत वना पाटील यांच्या मालकीची असून या वरील प्रस्तावित प्लेग्राउंडसाठी असलेले आरक्षण वगळण्यास व त्यानुसार आवश्यक कार्यवाही करण्यासाठी शासनास अहवाल सादर करणेस मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-२३५ — मौजे पिंपरी ता.जि. धुळे येथील गट नं. १/१/ अ क्षेत्र १२ हेक्टर या जागेवर शैक्षणिक संकुल आरक्षण प्रस्तावित करणेबाबत यांच्या शासनास अहवाल सादर करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता — वरील तिनही विषय सारखेच आहे. सन्मा विधानसभा सदस्य श्री. राम भदाणे यांच्या पत्रानुसार मौजे नगाव गट नं. ३०६ व मौजे नगाव गट नं. ३०३ तसेच पिंप्री गट नं. १ या जागेतील आरक्षणाबाबत विनंती केली होती. त्या अनुषंगाने वाढीव हददीचा विकास आराखडा अंतिम मंजुरीस्तव शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे. त्यामुळे सदर आलेल्या विनंती

पत्रानुसार सदर आरक्षण वगळणेबाबत शासनास सादर करणेबाबत सदरचा विषय मे. महासभेसमोर सादर झालेला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक याबाबत नगररचना विभागाचे मत काय.

मा.उपअभियंता (नर) हे प्रकरण शासनस्तरावर असल्याने शासन स्तरावर निर्णय होणार आहे. याबाबत विभागाचे मत आरक्षण वगळणे योग्य राहणार आहे तसेच पर्यायी जागा उपलब्ध करुन दिली जाणार आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक २३५ दिनांक ०२/०२/२०२५**

मौजे पिंपरी ता.जि. धुळे येथील गट नं. 1/1/ अ क्षेत्र 12 हेक्टर जागा महानगरपालिका, धुळे यांच्या कडून आरक्षित करण्यात आलेली आहे. तरी सदरील आरक्षित जमीनीवर शैक्षणिक संकुल बांधणे गरजेचे असल्याने सदर जागा शैक्षणिक संकुलासाठी आरक्षित करण्यात यावी अशी मागणी मा. आमदार राघवेंद्र (राम)मनोहर भदाणे यांनी केली आहे.

त्यानुषंगाने सदर जागेचा 7/12 उताराचे अवलोकन केले असता उक्त जागेची मालकी हि “मोफत गुरचरण” या नावाने दिसून येत आहे तसेच नगरभूमापन कार्यालयाचा मोजणी नकाशा सादर केला नसल्याने मौजे पिंपरी गट.क्र.1 चे संपूर्ण क्षेत्र विचारात घेऊन सदर क्षेत्र शासन नगरविकास विभागाकडील निर्णय क्र.धुमपा-2011/प्र.क्र.504 (भाग-1)/नवि-25 दि.05/1/01/2018 अन्वये महानगरपालिका हद्दीलगतचे 11 “गावांचा धुळे महानगरपालिका हद्दीत समावेश करण्यात आलेला आहे.मौजे पिंपरी या गावातील” जमिनी महानगरपालिका हद्दीत समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

उक्त वाढीव हद्दीचा विकास योजना आराखडा तयार करू महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 चे कलम 26 (1) अन्वये दि.15/05/2025 रोजीच्या राजपत्रात तसेच स्थानिक वृत्तपत्रात जाहीर सूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यात मौजे पिंपरी गट.क्र.1 हि मिळकतीचे काही क्षेत्र शेती/ ना-विकास विभागात (Agricultural/ No Development Zone) मध्ये समाविष्ट आहे. तसेच काही क्षेत्रावर आरक्षण क्र.41 ने AFFORDABLE HOUSING व आरक्षण क्र. 42 ने MUNICIPAL PURPOSE व आरक्षण क्र. 43 ने GARDEN व आरक्षण क्र.44 ने CREMATION GROUND तसेच आरक्षण क्र.45 ने SOLID WASTE MANAGEMENT व आरक्षण क्र.46 ने LOGISTIC PARK/ WAREHOUSE या आरक्षणाने बांधीत आहे. व सुरत-नागपूर राष्ट्रीय महामार्गाने (DIVERESION HIGH WAY) तसेच DHULE INDORE RAILWAY LINE ने बांधीत आहे. व 12.0 मी व 18.00 मी विकास योजना रस्त्याने बाधीत आहे.

तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 28 (4) नुसार सदर जागा हि आरक्षण क्र 41 ने AFFORDABLE HOUSING व आरक्षण क्र. 42 ने MUNICIPAL PURPOSE व आरक्षण क्र. 43 ने GARDEN व आरक्षण क्र.44 ने CREMATION GROUND तसेच आरक्षण क्र.45 ने SOLID WASTE MANAGEMENT व आरक्षण क्र.46 ने LOGISTIC PARK/ WAREHOUSE या प्रस्तावासाठी आरक्षित करून सदर प्रस्ताव शासनास अंतिम मंजुरीसाठी सादर करणेत आलेला आहे.

त्यामुळे सदरबाबत शासनस्तरावरून आरक्षण वगळणेबाबत धोरणात्मक निर्णयासाठी सदर विषय मे. महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, मौजे पिंपरी ता.जि. धुळे येथील गट नं. १/१/ अ क्षेत्र १२ हेक्टर या जागेवर शैक्षणिक संकुल आरक्षण प्रस्तावित करण्यास मान्यता देणेत येत आहे. व आवश्यक कार्यवाहीसाठी शासनास अहवाल सादर करणेस मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-२३६ धुळे महानगरपालिका मालकीचे राजर्षी छत्रपती शाहु महाराज नाट्य मंदिर भाडे तत्वावर वापरास देणे करीता शुल्क व नविन नियमावली लागु करणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.सहा.आयुक्त छत्रपती शाहु नाटय मंदिर हे यापुर्वी भाडे तत्वावर श्रीकृष्ण खांडसरी या कंपनीला देण्यात आला होता. त्याची मुदत व वेळ संपल्यानंतर सदर नाटयमंदिर मनपा ताब्यात आहे. सदरचे नाटयमंदिर स्वत: चालविण्याची मनपाची इच्छा असुन ते भाडेतत्वावर उपलब्ध करुन देण्यासाठी काही नाममात्र फी आकारण्यात आली आहे. आपण जर नाममात्र शुल्क आकारुन ते भाडेतत्वावर दिले तर मनपाचे जास्त उत्पन्न प्राप्त होवु शकते. त्याअनुषंगाने सर्व नियम अटी लागु करुन भाडे तत्वावर देणेकामी सदरचा विषय मे. महासभेसमोर सादर झालेला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक भाडे दर काय व कसे आहेत.

मा.सहा.आयुक्त सांस्कृतिक कार्यक्रमास भाडे रु. ५०००/- राहिल. व दोन सत्र असल्यास रु. १००००/- तसेच पुर्ण दिवस असल्यास रु. १४०००/-, शैक्षणिक कार्यक्रम असल्यास रु.२५००/- त्यात दोन सत्र असल्यास रु. ५०००/- संपुर्ण दिवस असल्यास रु. ७०००/- असे भाडे आकारणी दर आहे. तसेच नाटयगृहाबाहेरील खुली जागा रु. ५०००/- भाडे राहिल तसेच हौशि कलावंतांना ५० टक्के सुट देण्यात आली आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक यात सुरक्षा अनामत जी आहे ती भाडे रक्कमेच्या ५० टक्के आकारावी. तसेच मनपा शाळांसाठी निशुल्क ठेवावे. तसेच हे मनपा शाळा सोडुन कोणालाही मोफत देण्यात येवु नये. याबाबत दक्षता विभागने घ्यावी तसेच याचे चांगल्याप्रकारे जाहिरात फलक बनवा. नाटयगृहाच्या दर्शनी भागासमोर लावा. तसेच सोशल मिडीया पेजवर जाहीर करावे. तसेच शहरात २-३ ठिकाणी बॅनर लावावे व वृत्तपत्रात जाहिरात द्यावी. तसेच आस्थापना विभागाने ३ सत्रात सुरक्षा रक्षक नेमणेबाबत दरपत्रक मागवुन निश्चीत करावी. तसेच तेथील स्वच्छतागृह नियमीतपणे स्वच्छ करण्याची कार्यवाही करावी. तसेच तेथील मागील भिंती तुटल्या आहेत त्या दुरुस्त कराव्या. सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक २३६ दिनांक ०२/०२/२०२५**

राजर्षी छत्रपती शाहु महाराज नाटयमंदिर मागिल सन २०१५ पासुन १० वर्ष मे श्री कृष्ण खांडसरी तर्फे व्यवस्थापक श्री राजेद्र भावसार धुळे यांना भाडेतत्वावर वापरण्यास देण्यात आलेले होते. तरी सादर नाट्य मंदिर संदर्भात मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे समक्ष दि.२८/११/२०२५ रोजी बैठक घेण्यात आलेली असता त्या संदर्भात खालील प्रमाणे बाबी लक्षात आलेल्या आहेत.

सदरचे नाट्य मंदिर हे मे. श्री खांडसरी व्यवस्थापक श्री राजेंद्र भावसार यांना देण्यात आलेल्या नाटय गृहाची मुदत संपलेली आहे त्यामुळे सदरचे नाट्य मंदिर ताब्यात घेणे आवश्यक आहे.

त्या प्रमाणे सदरचे नाट्य मंदिर ताब्यात घेण्यासाठी मा. आयुक्त तथा प्रशासक सो. यांनी मान्यता दिल्यानुसार सदरचे नाट्य मंदिर ताब्यात घेण्यात आलेले आहे तरी सदरचे नाट्य मंदिर यापुढे खाजगी एजन्सी ला न देता सदर नाट्य मंदिर धुळे मनपा स्व:ता दुरुस्ती करुन ते भाडे तत्वावर देण्यास सुचित केल्यानुसार सदरचे प्रकरण मालमत्ता व्यवस्थापन विभागकडे संपुर्ण कागदपत्रास वर्ग करणे सुचविले आहे तसेच सदर नाट्य मंदिर संदर्भात भाडे आकारणी अनामत रक्कम कार्यक्रम सत्राची वेळ तसेच नाट्य मंदिर संदर्भातील नियमावली तयार करणेस आवश्यक आहे त्यानुसार खालील प्रमाणे दर व नियमावली तयार करणेत आलेली आहे.

**राजर्षी छत्रपती शाहु महाराज नाट्य मंदिर उपलब्ध सुविधा**

१.प्रेक्षकांसाठी पुशबॅक स्वरुपाची ८६० प्रेक्षकांकरीता बैठक व्यवस्था
२.पहिल्या मजल्यावर मोठे सभागृह व अभ्यागत कक्ष
३.वाहनतळा करीता भरपुर प्रमाणात मोकळे मैदान
४.कलावंताकरीता दोन (ग्रीन) कक्ष व एक अतिरीक्त कक्ष
५.अभ्यागतांकरीता (चार) व्ही.आय.पी. कक्ष
६.प्रशस्त प्रकाश व्यवस्था
७.अनुनाद संरक्षण प्रणाली
८.कलाकारांना प्रदर्शन करण्यासाठी १०.५०मी x ११.६०मी चा असा भव्य रंगमंच
९.परिपुर्ण अशी नेपथ्या व्यवस्था
१०.विद्युत पुरवठयाकरीता जनित्राची व्यवस्था आयोजकांना स्वत:च्या स्तरावर करुन यावी लागेल.
११. अतिरिक्त प्रकाश व्यवस्था व ध्वनीक्षेपण व्यवस्था आयोजनकांना कारवी लागेल.

तरी वरील प्रमाणे दरांना दर सुधार समिती सभा क्र.१ मध्ये मान्यता मिळणेस सादर करणेत आलेले आहेत खालील प्रमाणे दरांना मान्यता मिळालेली आहे.

| अ.क्र. | बाब | भाड्याचे प्रस्तावति दर | अनामत रक्कम दर |
|---|---|---|---|
| १ | संस्कृतिक कार्यक्रम | प्रति सत्र रु.५,०००/- | २,५००/- |
| | | दोन सत्र रु.१०,०००/- | ५,०००/- |
| | | संपुर्ण दिवस रु.१४,०००/- | ७,०००/- |
| २ | शैक्षिणक कार्यक्रम | प्रति सत्र रु.२,५००/- | १,२५०/- |
| | | दोन सत्र रु.५,०००/- | २,५००/- |
| | | संपुर्ण दिवस रु.७,०००/- | २,५००/- |
| ३ | महानगरपालिका शाळा | निशुल्क | |
| ४ | स्थानिक हौशी कलावंत | अ.क्र.१ च्या ५०% सवलत | |
| ५ | इनडोअर हॉल पहिला मजला | प्रति दिवस | ५००/- |
| | | ७ दिवसांसाठी | २,१००/ |
| | | १५ दिवसांसाठी | ३,०००/- |
| | | १ महिन्यासाठी | ५,०००/- |
| ६ | नाट्यगृहा मागील खुले मैदान<br>लग्न समारंभ/ प्रदर्शन | प्रति दिन | ५,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | अनुषंगीक कार्यक्रम | | |
| भाडयाच्या रकमेवर वस्तु व सेवा कर १८% प्रमाणे अतिरिक्त आकारण्यात येईल. | | | |

उक्त प्रमाणे धुळे महानगरपालिकेमार्फत छत्रपती शाहू महाराज नाट्यगृह चालवणेस तसेच दरसुधार समितीने केलेल्या शिफारशीनुसार भाडे व अनामत रक्कम लागू करणेस प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन प्रस्तावानुसार व झालेल्या चर्चेनुसार, धुळे महानगरपालिका मालकीचे राजर्षी छत्रपती शाहु महाराज नाट्य मंदिर भाडे तत्वावर वापरास देणे करीता दरसुधार समितीने शिफारस केलेले भाडे शुल्क व अनामत रक्कम निश्चीत करणेस व प्रस्तावात नमूद अटी शर्ती तसेच नविन नियमावली लागु करणेस वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-२३७ धुळे महानगरपालिका हद्दीतील बखळ जागेवरील करपात्र मुल्यात वाढ करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपायुक्त आपण २१ जानेवारी रोजी दर सुधार समितीची बैठक घेतली होती. सदर बैठकीत करपात्र जे मुल्य आहे. रिकाम्या भुखंडाचे दर सध्या रु. १/- प्रती चौ. फु.प्रति वर्ष आहेत ते दर रु. ४/- प्रति चौ. फु. करावेत असा निर्णय झाला होता. हे दर २००६ च्या ठरावानुसार होते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १२८ अ (३) अन्वये मालमत्ता कर क्रमशः वाढत्या प्रमाणात लागु करता येईल असे नमुद आहे. त्यामुळे दर रु. १/- प्रति चौ. फु. वरुन रु. ४/- प्रति चौ. फु. प्रति वर्ष करणे योग्य राहिल असे विभागाचे मत आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक कमी असल्यामुळे तो वाढवला आहे. आणि त्याची रिव्हीजन ही झाली नव्हती.

मा.उपायुक्त इतर मनपांपेक्षा हे दर समतुल्य आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक यापुढे महानगरपालिका ॲक्टमधले शब्द वापरावे. बखळ या शब्दाऐवजी खाजगी मालकीच्या खुल्या जागा असे शब्द वापरावे. सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक २३७ दिनांक ०२/०२/२०२५**

धुळे महानगरपालिका हद्दीतील खाजगी मालकीच्या खुल्या जागेवरील (रिकाम्या भुखंड) संदर्भात मा.आयुक्त धुळे महानगरपालिका यांच्याशी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या कराच्या दरामध्ये सुधारणा करणे साठी निर्देश देण्यात आलेले होते.

**सध्याचे मालमत्ता कराचे दर खालीलप्रमाणे आहेत( सन २०१५-१६ )**

| **अ.नं.** | **झोन नंबर** | **आर.सी.सी. रुपये प्रती चौ.मी.** | **लोडबेरींग रुपये प्रती चौ.मी.** | **पत्र्याचे घर रुपये प्रती चौमी.** | **झोपडपट्टी रुपये प्रती चौमी. (कच्चे घर)** | **बखळ जागा** |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | १ | २२ | १७ | ११ | ०८ | १/- रु प्रती |
| २ | २ | २० | १४ | १० | ०६ | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ३ | १७ | ११ | ०८ | ०५ | चौ.फुट (प्रती वर्ष) वाणिज्य करीता दुप्पट दर |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १२७ अन्वये महानगरपालिकेस मालमत्ता कर बसवता येईल व १२८ अ (३) अन्वये मालमत्ता कर क्रमश : वाढत्या प्रमाणात लागु करता येईल. असे नमुद आहे. सध्याचे रिकाम्या भुखंडासंदभातील दर हे मे.महासभा ठराव क्र.१९८ दिनांक-२१/०३/२००६ च्या ठरावानुसार लागु केले आहेत. सन २००६-०७ पासुन सदर दरामध्ये कोणतीही सुधारणा केली गेली नसल्याचे दिसुन येत नाही.

त्यामुळे दर सुधार समिती शासन परिपत्रक दिनांक-११/११-१९९९ अन्वये व मा.आयुक्त सो यांचे आदेश दिनांक-०६/०१/२०२६ अन्वये रिकाम्या भुखंडाच्या कराच्या दरामध्ये सुधारणा करण्याकरीता दर सुधार समितीपुढे दिनांक-२१/०१/२०२६ रोजीच्या बैठकीत खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

१) रिकाम्या भूखंडाचे करपात्र मुल्य ठरविण्याचे दर ४.०० प्रती चौ.फु. प्रति वर्ष करावेत. जे सध्या रु १/- प्रती चौ.फु. प्रति वर्ष आहेत.

२) रिकाम्या जागेचा वापर वाणिज्य वापरासाठी करत असल्यास त्यांचे दर प्रस्तुत दराच्या दुप्पट ठेवण्यात यावेत. म्हणजेच ८.०० रु प्रति चौ.फुट प्रति वर्ष करण्यात यावेत.

उक्त बाबत दिनांक-२१/०१/२०२६ रोजीच्या दर सुधार समितीच्या बैठकीत खालील मंजुरी देण्यात आली.

१) रिकाम्या भुखंडाचे करपात्र मुल्य रु.१.०० प्रती चौ.फु. प्रति वर्षा वरुन रु.४.०० चौ.फु. प्रति वर्ष (वाणिज्यसह)करणे बाबत मंजुरी देण्यात आलेली आहे.

तसेच दिनांक-२२/०१/२०२६ अंदाजपत्रकीय मे.स्थायी समितीच्या बैठकीत रिकाम्या भुखंडाचे करपात्र मुल्य रु.१.०० प्रती चौ.फु. प्रति वर्षा वरुन रु.४.०० चौ.फु. प्रति वर्ष (वाणिज्यसह) करणे बाबत मंजुरी देण्यात आलेली आहे.

सदरचा बखळ जागेचा (रिकाम्या भुखंड) कर वाढीबाबतचा विषय मे.महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, दरसुधार समितीने शिफारस केल्यानुसार धुळे महानगरपालिका हद्दीतील खाजगी मालकीच्या खुल्या जागेवरील करपात्र मुल्य प्रस्तावात नमूद दरानुसार आकारणी करणेस वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-२३८ — श्री.नवनीत मुरलीधर सोनवणे, कार्यकारी अभियंता यांची सेवा कायमस्वरुपी धुळे महानरपालिकेत वर्ग होणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.कार्या. अधिक्षक — श्री. नवनीत सोनवणे, कार्य. अभियंता यांनी दि. ७/१/२०२६ रोजी विनंती अर्ज सादर करुन त्यांची सेवा कायमस्वरुपी धुळे मनपात वर्ग करण्याबाबत कळविले आहे. परंतु मनपात दोन पदे आहेत. कार्य.अभियंता चे एक पद पदोन्नतीचे आहे व एक पद प्रतिनियक्तीचे आहे. तथापी मागील महिन्यात कार्य. अभियंता श्री. चव्हाण सो. रिटायर्ड झाल्यामुळे एक पद पदोन्नतीचे

रिक्त आहे व एक पद कार्यरत आहे. परंतु दोन कार्य. अभियंता मनपात कार्यरत आहे. एक पाणी पुरवठयासाठी व एक बांधकाम विभागासाठी

मा.आयुक्त तथा प्रशासक आता प्रमोशनसाठी कोणी पात्र आहे का कार्य. अभियंता या पदावर

मा.कार्या. अधिक्षक उप अभियंता श्री. उगले साहेब आहेत. पदोन्नतीच्या पदावर उपलब्ध आहेत.

मा.आयुक्त तथा प्रशासक याबाबत फेरविचार करु. तोपर्यंत सदरचा विषय तहकुब ठेवण्यात येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक २३८ दिनांक ०२/०२/२०२५**

श्री.नवनीत सोनवणे, कार्यकारी अभियंता यांनी दिनांक ०७/०१/२०२६ रोजी विनंती अर्ज सादर करुन नमूद केले की, दिनांक २४.०८.२०२३ रोजी अन्वये प्रतिनियुक्तीवर कार्यकारी अभियंता पदी रुजू झालेलो आहे. मी आज अखेर धुळे महानगरपालिकेत काम करत आहे. तसेच त्या अनुषंगाने श्री.नवनीत सोनवणे, कार्यकारी अभियंता यांनी त्यांची सेवा धुळे महानगरपालिका येथे कायम स्वरूपी वर्ग करण्या करिता मे. महासभेची मंजुरी मिळण्यास विनंती केली आहे.

शासन आदेशानुसार श्री.नवनित मुरलीधर सोनवणे यांची धुळे महानगरपालिकेतील कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा या पदावर प्रतिनियुक्ती नियुक्ती केलेली आहे. त्यानुसार श्री.नवनीत सोनवणे, दिनांक २४/०८/२०२३ रोजी धुळे महानगरपालिकेतील कार्यकारी अभियंता, पाणी-पुरवठा चे पदावर रुजू झालेले आहे.

शासनाने धुळे महानगरपालिकेकरिता आकृतीबंध मंजूर करुन दिलेला आहे, त्यानुसार कार्यकारी अभियंता ची ०२ पदे मंजूर आहेत.

धुळे महानगरपालिका सुधारित सेवाप्रवेश नियम, २०२२ नुसार १ पद पदोन्नतीने व १ पद प्रतिनियुक्तीने भरणेबाबत नमूद आहे.

त्यानुसार सद्यस्थितीत पदोन्नतीच्या पदावर श्री.प्रदीप चव्हाण, कार्यकारी अभियंता कार्यरत आहेत.व प्रतिनियुक्तीच्या पदावर श्री.नवनीत सोनवणे, व श्रीमती वर्षा घुगरी, कार्यकारी अभियंता कार्यरत आहेत. तथापि कार्यकारी अभियंता संवर्गातील २ पदे मंजूर असून सद्यस्थितीत एकूण ०३ कार्यकारी अभियंता कार्यरत आहेत.

नगर विकास विभाग शासन आदेश क्रमांक धुमपा-२०२३/प्र.क्र.१५४/नवी-२५ दिनांक २२/०८/२०२३ अन्वये श्री.नवनीत सोनवणे, कार्यकारी अभियंता यांची प्रथम २ वर्षे कालावधीकरिता प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आलेली असून, सदर नियुक्तीची मुदत संपुष्टात आलेली आहे.

करिता जा.क्र.धुमपा/आस्था/५८९/२०२५ दिनांक ०१/०८/२०२५ अन्वये प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्याबाबत शासनास शिफारस केलेली आहे. तथापि अद्यापपावेतो श्री.सोनवणे यांच्या प्रतिनियुक्तीस मुदतवाढ दिलेली नाही.

श्री.नवनीत सोनवणे, कार्यकारी अभियंता यांची सेवा कायमस्वरुपी धुळे महानगरपालिकेत वर्ग होणेबाबतचा विषय धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी मे. महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, सद्यस्थितीत सदर प्रस्ताव तहकूब ठेवण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-२३९ धुळे महानगरपालिका जागेतुन व्यक्तींना काढुन टाकणे व थकबाकी भाडयाची रक्कम व नुकसान भरपाईची रक्कम वसुल करणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.सहा.आयुक्त धुळे मनपाच्या पुष्कळश्या जागा हया भाडे तत्वावर, करारावर देण्यात आलेल्या आहेत. त्यात बहुतांश करार संपलेले आहे व थकबाकी दिसुन येत आहे व भाडेकरुन भाडे भरत नाही व नविन करारनामा ही करायला तयार नाही. सदर भाडेकरुंना काढुन टाकणे व थकबाकी वसुल करणेकामी सदरचा विषय मे. महासभेपुढे सादर झालेला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ८१- ब व कलम ८१- क नुसार आपल्याला वेगवेगळया ॲक्शन घ्याव्या लागतात. कलम ८१ काय सांगते मनपाच्या वेगवेगळया जागा असतील. त्याचा विनियोग करण्याचा नियमांमध्ये वेगवेगळया गोष्टी आहे. तयात मनपांच्या जागांचे संपलेले करार असतील तर संबंधीतांना कशाप्रकारे सुचना द्याव्यात, जागा रिक्त कशा करुन घ्याव्यात, एखाद्याने मनपाच्या अटी शर्तींचे उल्लंघन केले असेल किंवा परस्पर पोटभाडेकरु ठेवले असेल याचे त्यात नियम आहे. मनपाचे गाळे घेवुन परवानगी न घेता त्यात बदल केले असतील त्याचे नियम आहेत. यासर्व प्रकरणांमध्ये नोटीसेस कशा करायच्या, त्याचे फॉरमॅट कसे असावे, कालावधी किती असावा यासाठी ही नियमावली आहे. ती आपल्याला मंजुर करायची आहे. उद्या कोणी न्यायालयात कोणी गेले तर न्यायालय पहिले विचारते ८१ ब ची नियमावली मनपाने अंतिम केली का. त्यासाठी ही नियमावली अंतिम होवुन प्राधीकृत करणे गरजेचे असते. ही नियमावली मनपाच्या संकेतस्थळावर टाकण्यात यावी. तसेच वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्दी द्यावी. जनजागृती करावी. तसेच यापुढे ज्या कृती होती त्या ८१ ब च्या नियमावलीनुसार होतील. सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक २३९ दिनांक ०२/०२/२०२५**

धुळे महानगरपालिका जागेतुन व्यक्तींना काढुन टाकणे व थकबाकी भाडयाची रक्कम व नुकसान भरपाईच रक्कम वसुल करणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ८१-ब व कलम ८१-क अन्वये विविध नोटीसा कलम ४७२ ते कलम ४७७ मध्ये विहित नोटीसांवर आयुक्तांच्या मान्यतेने संबंधित विभागाचे उपायुक्त यांना स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे. तसेच नोटीसेस बजावण्यास संबंधित विभागाचे प्रमुख अथवा संबंधित विभागातील कर्मचारी यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनिमय प्रकरण आठ (अ) अन्वये चौकशी करणे कोणत्याही बाबतील महानगरपालिका आयुक्त अथवा विशिष्ट प्रकरणात महानगरपालिका आयुक्त यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी अथवा व्यक्ती (विधी सल्लागार, विधी तज्ञ इ.) यांना आवश्यक चौकशी करता येईल. त्यानुसार सदर प्रस्ताव मे. महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ८१ अन्वये प्रस्तावात नमूद नियमावलीस मान्यता देणेत येत आहे. तसेच त्यानुसार कार्यवाही करणेस वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-२४० धुळे मनपा क्षेत्रासाठी व्यवसाय परवाना / वस्तु ठेवण्यासाठी परवाना/ विविध प्रकारचे परवाने यांचे सुधारित दर निश्चीतीबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.सहा.आयुक्त धुळे महानगरपालिका आर्थिकदृष्टया प्रबळ होण्याकामी छोटे, मध्यम, मोठे उद्योग व्यवसाय विक्री केंद्रप्रमाणे परवाना वार्षिक दरपत्रक तयार केले आहे. हे दर मंजुरीस्तव विषय महासभेपुढे सादर झालेला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक यात मनपाने वेगवेगळे दर तयार केले होते. ते जे दर आकारले नाही पाहिजे असे देखील दर यादीत होते. आणि अतिशय किचकट दर ठरवले होते. यात आपण सुटसुटीत केले आहे व माफक ठेवले आहे. यात माझी विभागाला सुचना राहिल की, मनपाचा उत्पन्नाचा स्त्रोत आहे.या वर्षापासुन ज्यांना ज्यांना हे परवाने लागु असतील. त्यांना सर्व्हे करुन नोटीसेस दिल्या पाहिजेत. तसेच हे परवाने मिळण्याची प्रक्रिया सुटसुटीत करावी. जसे कॅम्प लावणे, ऑनलाईन करणे असे असावे. मध्यस्थी व अडथळे न आणता प्रक्रिया सुरळीत पार पाडावी. पुढील आर्थिक वर्षापासुन याचे इम्पीलीमेंटेशन चांगले करावे. सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक २४० दिनांक ०२/०२/२०२५**

धुळे महानगरपालिका आर्थिक दृष्ट्या प्रबळ होण्याकामी धुळे महानगरपालिका ठराव क्रं.११५ दिनांक १९/०७/२०१८ अन्वये महाराष्ट्र अधिनियम १९४९ चे कलम ३१३, ३७६, ३७७, ३८७ नुसार मा.आयुक्त सो. यांनी छोटे, मध्यम, मोठे, उदयोग व्यवसाय विक्री केंद्र प्रमाणे परवाना वार्षिक दरपत्रक तयार करुन दिनांक १/०९/२०१८ रोजीच्या दै. दिव्य मराठी या वर्तमान पत्रातुन जाहिर नोटीसद्वारे धुळे शहरातील व्यवसाय, उदयोग धंदा, जाहिरात करणारे व्यवसायीकांना परवाना प्राप्त करुन घेण्याबाबत सुचीत केलेले होते तसेच वेळोवेळी व्यवसायीकांनी परवाना घेणेबाबत व्यापारी असोसिएशन, संघटना व म.न.पा. वरीष्ठ अधिकारी समवेत मिटींग घेण्यात आल्या होत्या परंतु व्यावसायिकांकडुन फारसा प्रतिसाद मिळालेला नाही. सन ऑक्टोंबर २०१९ ते जानेवारी २०२६ आज अखेर एकुण ३१० इतके परवाना धारक आहेत.

उपरोक्त प्रमाणे धुळे महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बळकट झालेली नसुन जा.क्र./धुमपा/आस्था/१२९८/२०२५-२६ दि.०६/०१/२०२५ रोजी दर सुधार समीती गठीत करण्यात आली दर सुधार समिती पुढे मा.आयुक्त सो.व मालमत्ता कर विभाग प्रमुख यांच्या मार्गदर्शनानुसार परवाना लायसन्स सुधारित वार्षिक दर खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहेत.

| अ.नं. | परवाना आवश्यक असणाऱ्या ठिकाणाचे क्षेत्रफळ | प्रस्ताविक दर |
|---|---|---|
| १ | १०० चौ. फुटापर्यंत | ६०० रू. प्र प्रतिवर्ष |
| २ | १०१ ते ४०० चौ. फुटापर्यंत | ९०० रू. प्रतिवर्ष |
| ३ | ४०१ ते ८०० चौ. फुटापर्यंत | १२०० रू. प्रतिवर्ष |
| ४ | ८०१ ते २००० चौ. फुटापर्यंत | १५०० रू. प्रतिवर्ष |
| ५ | २००१ ते ५००० चौ. फुटापर्यंत | १८०० रू. प्रतिवर्ष |
| ६ | ५००१ ते १०, ००० चौ. फुटापर्यंत | २१०० रू. प्रतिवर्ष |
| ७ | १०,००१ ते १५,००० चौ. फुटापर्यंत | २४०० रू. प्रतिवर्ष |
| ८ | १६००१ ते चौ. फुट पासुन पुढे | २७०० रू. प्रतिवर्ष |

उक्त तक्यांतिल दरांस दर सुधारित समितीची दिनांक २१/०१/२०२६ रोजी सकाळी ११ वाजता मा.आयुक्त सो. यांच्या दालनात बैठक होवुन उक्त तक्त्यास मंजुरी मिळालेली आहे.

उपरोक्त तक्यांत दर्शविलेल्या दरांनुसार आकारणी करणेबाबत प्रस्ताव मे. महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, दर सुधार समितीच्या शिफारशीनुसार मनपा उत्पन्न वाढीच्या दृष्टीने धुळे मनपा क्षेत्रासाठी व्यवसाय परवाना / वस्तु ठेवण्यासाठी परवाना/ विविध प्रकारचे परवाने यांचे उक्त प्रस्तावात नमूद सुधारित दर निश्चीत करणेस मान्यता देणेत येत आहे.

विभागाने शहरातील सर्व व्यवसायांचे सर्वेक्षण करावी. तसेच परवाना प्रक्रिया सुटसुटीत व सुलभ होईल या दृष्टीने कार्यवाही करावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-२४१ धुळे महानगरपालिकेच्या नवीन आर.टी.ओ. ऑफिस येथील मलशुद्धीकरण केंद्रात 'टर्शरी ट्रीटमेंट प्लांट' (Tertiary Treatment Plant) बांधणे व ते पाणी सोनवद प्रकल्पापर्यंत पोहोचविण्याकामी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) नियुक्त करण्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.कार्य.अभियंता आपण धुळे शहरात साधारण ६० ते ७० एमएलडी मध्ये पाण्याच्या पुरवठा करत असतो. सदर पाण्यापैकी जवळपास ३० ते ३५ मिलीयन लिटर पाणी सांडपाणी म्हणुन फेकुन देतो. सदर सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी नुकतेच नविन आरटीओ ऑफिसच्या बाजुला १७ एमएलडी चा प्लांटचे काम सुरु आहे. आणि एक ४० एमएलडी च्या प्लांटचे काम ऑक्सीडेशन प्लांटच्या जवळ सुरु आहे. हे दोनही प्लांट ॲक्टीव्हेट होण्याच्या मार्गावर आहे. १७ एमएलडी दोन महिन्यात सुरु होईल. ३० ते ३५ एमएलडी पाणी आपण जे फेकुन देतो. सदर पाण्यास टर्शरी ट्रीटमेंट म्हणजे शुध्दीकरण करणार आहेत म्हणजे आधुनिक पध्दतीने पिण्यायोग्य करणे इतके शुध्द होईल. ही प्रक्रिया करुन सोनवद कॅनॉल आहे. जो १७ एमएलडी पासुन ३ किमी अंतरावर आहे. ती ग्रव्हीटी लाईन होणार आहे. त्याला पंपींगची गरज भासणार नाही म्हणजे फ्री ऑफ कॉस्ट त्या कॅनॉलला सोडता येईल हे ३० ते ३५ एमएलडी पाणी इरीगेशन डिपार्टमेंटला सोनवद डॅमला देणार आहोत. त्या ३० ते ३५ एमएलडी आपण क्रेडीट घेता येईल. म्हणजे अक्कलपाडयाला पाणीपटटी भरतो ती शुन्य होईल. यातुन इरिगेशनला फायदा होईल मनपाला फायदा होईल. यातुन मनपाला कार्बन क्रेडीट देखील मिळु शकते. यासाठी डीपीआर करण्याकरीता मानवसेवा कंन्स्ल्टंट हे शासन नियुक्त असल्याने त्यांच्या नियुक्तीबाबत विचार करणेकामी विषय मे. महासभेपुढे सादर झालेला आहे. शासन दरानुसार फी घेण्यासही त्यांनी तयारी दर्शविली आहे. डीपीआर मंजुरी नंतर ही ते काम करण्यास तयार आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक यातील मेजर अट अशी राहील की जनरली आपण मोठमोठे डीपीआर बनवतो. डीपीआर शासनाकडुन मंजुर होत नाही. पीएमसी चे चार्जेसचे खुप मोठया प्रमाणात बिल येते. या केसमध्ये जर डीपीआर मंजुर झाले तरच त्यांना शुल्क लागु राहतील. या अटीवर काम करण्यास तयार असल्यास तरच मान्यता देण्यात येत आहे. आणि डीपीआर भविष्यात मंजुर झाला नाही त्यासाठी निधी मिळाला नाही तर मात्र पीएमसीला शुल्क मिळणार नाही.

मा.मुख्य लेखाधिकारी मोठया मनपांमध्ये हे प्रयोग यापुर्वी झालेले आहे. लोकांची याबददल मानसिकता नाही की सांडपाण्याचे पाणी नागरिकांनी वापरावे.

मा.आयुक्त तथा प्रशासक आपण डायरेक्ट वापर करणार नाही यासाठी टर्शरी प्लांट करुन तलावांमध्ये सोडणार आहोत किंवा शेतीच्या कामाकरीता वापरु शकतो. सोनवद डॅमचा वापर आपण पिण्याच्या पाण्यासाठी वापर करत नाही. शेतकऱ्यांना वापरासाठी काही बायपास करता येईल हे देखील पहावे. सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक २४१ दिनांक ०२/०२/२०२५**

धुळे महानगरपालिकेकडून नवीन आर.टी.ओ. ऑफिस येथील मलशुद्धीकरण केंद्रात (STP) शहरात जमा होणारे सुमारे 17 MLD सांडपाणी शुद्ध केले जाते. सध्या हे पाणी नदीमध्ये सोडून दिले जाते. महाराष्ट्र शासनाच्या पाटबंधारे विभागाच्या सूचनांनुसार, एकूण पाणी वापराच्या 30 टक्के पाण्याचा पुनर्वापर करणे बंधनकारक आहे. हे सांडपाणी पुनर्वापरायोग्य करण्यासाठी त्यावर 'टर्शरी ट्रीटमेंट' प्रक्रिया करणे आणि ते पाईपलाईनद्वारे सोनवद प्रकल्पापर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे.ज्यामुळे महानगरपालिकेला अक्कलपाडा येथे भरावी लागणारी पाणीपट्टी कमी होऊन महानगरपालिकेची मोठ्या प्रमाणात बचत होणार आहे.

सदर कामासाठी मानवसेवा कन्सल्टंट, धुळे यांनी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणून काम करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. सदर संस्था महाराष्ट्र शासनाच्या नगरपरिषद प्रशासन संचालनालय आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (MJP) यांच्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांच्या नामिका सूचीमध्ये (Empaneled List) समाविष्ट आहे.अर्जात महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाच्या विविध शासन निर्णयांचा उल्लेख करण्यात आला आहे, ज्यानुसार संस्था सल्लागार म्हणून काम करण्यास पात्र आहे. त्यांची फी प्रकल्प मंजुरी नंतर देय राहील. तज्ज्ञ सल्लागारांमार्फत DPR तयार केल्यामुळे केंद्र व राज्य शासनाकडून निधी मिळण्यास तांत्रिक सुलभता येईल.

शहराच्या वाढत्या पाण्याची गरज आणि शासनाचे सांडपाणी पुनर्वापराचे नियम पाहता, 'टर्शरी ट्रीटमेंट प्लांट' उभारणे आवश्यक आहे.सदर प्रकल्प तांत्रिक स्वरूपाचा असल्याने, नियोजनापासून ते अंमलबजावणीपर्यंत तज्ज्ञ सल्लागाराची (PMC) आवश्यकता आहे.

मानवसेवा कन्सल्टंट हे शासन नियुक्त नामिकेवर असल्याने, त्यांच्या नियुक्तीबाबत विचार करणे तांत्रिकदृष्ट्या सोयीचे ठरेल. पर्यावरणाचे रक्षण आणि पाण्याचा प्रभावी पुनर्वापर करण्याच्या दृष्टीने, नवीन आर.टी.ओ. ऑफिस येथील 17 MLD मलशुद्धीकरण केंद्रात टर्शरी ट्रीटमेंट प्लांट बांधणे व पाईपलाईनद्वारे पाणी सोनवद प्रकल्पापर्यंत नेण्याच्या कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्त करण्यासाठी मे. महासभेची मंजुरी घेणे आवश्यक असल्याने उपरोक्त विषय मे. महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, धुळे महानगरपालिकेच्या नवीन आर.टी.ओ. ऑफिस येथील मलशुद्धीकरण केंद्रात 'टर्शरी ट्रीटमेंट प्लांट' (Tertiary Treatment Plant) बांधणे व ते पाणी सोनवद प्रकल्पापर्यंत पोहोचविण्याकामी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणून मानवसेवा कन्सल्टंट यांना शासनमान्य दरानुसार नियुक्ती करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच याकामी शासनस्तरावरील विविध योजनेतून

तथा जिल्हा नियोजन मंडळामार्फत निधी मागणी प्रस्ताव सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच सदर प्रकल्प अहवालास शासन मान्यता व निधी उपलब्धतेनंतर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारास शुल्क अनुज्ञेय राहील अशी स्पष्ट अट निविदा प्रक्रियेत व करारनाम्यात टाकण्यात यावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-२४२ धुळे शहर ग्राहक पाणी मीटर बसविण्याकामी 'सविस्तर प्रकल्प अहवाल' (DPR) तयार करण्यासाठी 'प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार' (PMC) यांची नियुक्ती करण्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.कार्य.अभियंता धुळे शहरामध्ये आज मितीस जवळपास १ लाख ३० हजारच्या आसपास प्रॉपर्टीज आहे. तथापी आपल्याकडे १५ हजार वॉटर मिटर अमृत २.० अंतर्गत मंजुर झाले होते. ते बसविण्याचे काम प्रगतीपथावर आहे. उर्वरीत प्रॉपर्टीज करीता मिटर बसविण्यासाठी निधी नाही. याकरीता डीपीआर करुन निधी प्राप्त करणेसाठी हा प्रस्ताव ठेवणेत आला आहे. यात यश इनोव्हेटीव्ह सोल्युशन्स एलएलपी छत्रपती संभाजीनगर यांनी पीएमसी म्हणन काम करण्यासाठी इच्छा दर्शविली आहे. या ही केसमध्ये प्रकल्प मंजुर झाला तरच ते त्यांची फी चार्ज करणार आहे. हे करण्यासाठी मे. महासभेच्या मान्यतेस्तव विषय सादर झाला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक वरील विषयाप्रमाणेच यातही अटी शर्ती राहतील. जर प्रकल्प मंजुर झाला तरच चार्जेस मिळतील. तसेच २४१ व २४२ या विषयांमध्ये शासनांच्या योजनांचे नावे टाकण्यात यावे अन्यथा इतर कोणत्याही शासकीय योजनेतुन करण्यास मे. महासभा मान्यता देणेत येत आहे. सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक २४२ दिनांक ०२/०२/२०२५**

धुळे महानगरपालिका क्षेत्रात पाणी पुरवठा सुरळीत नियोजन करण्यासाठी आणि पाणी पट्टी वसुलीत अचूकता आणण्यासाठी ग्राहक पाणी मीटर (Consumer Water Meter) बसविणे प्रस्तावित आहे. या कामासाठी राज्य आणि केंद्र शासनाच्या विविध योजनांतून निधी प्राप्त करण्याकामी एक 'सविस्तर प्रकल्प अहवाल' (DPR) तयार करणे आवश्यक आहे.

संदर्भित पत्राद्वारे यश इनोव्हेटिव्ह सोल्युशन्स LLP (YIS), छत्रपती संभाजीनगर यांनी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणून काम करण्याची इच्छा प्रदर्शित केली आहे. संस्थेने यापूर्वी छत्रपती संभाजीनगर, जळगाव, सोलापूर आणि सिमला महानगरपालिका तसेच विविध नगरपरिषदांसाठी पाणी मीटरिंग संदर्भात DPR तयार करण्याचे काम यशस्वीरीत्या केले आहे. संस्थेकडे 190 पेक्षा जास्त तज्ञ अभियंते आणि आधुनिक सॉफ्टवेअर (MS Project, Primavera) उपलब्ध आहेत.

केवळ मीटर बसवणे नव्हे, तर 'इंटिग्रेटेड वॉटर मॅनेजमेंट सिस्टिम' (डेटा गेटवे, बिलिंग इंटिग्रेशन, रिअल-टाइम मॉनिटरिंग) विकसित करण्याचा संस्थेचा अनुभव आहे. तसेच यश इनोव्हेटिव्ह सोल्युशन्स LLP (YIS) आपली फी प्रकल्प अहवालात समाविष्ट करण्यास

तयार असून, त्यांची फी प्रकल्प मंजुरी नंतर देय राहील. तज्ज्ञ सल्लागारांमार्फत DPR तयार केल्यामुळे केंद्र व राज्य शासनाकडून निधी मिळण्यास तांत्रिक सुलभता येईल.

यश इनोव्हेटिव्ह सोल्युशन्स LLP यांनी सादर केलेली कागदपत्रे आणि त्यांचा अनुभव पाहता, धुळे शहराच्या पाणी मीटर प्रकल्पासाठी मे. यश इनोव्हेटिव्ह सोल्युशन्स LLP (YIS) यांना 'सविस्तर प्रकल्प अहवाल' (DPR) तयार करणे व त्यांची 'प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार' (PMC) म्हणून नियुक्ती करण्याबाबत व सदर प्रकल्प अहवाल शासनास मंजुरीस्तव तसेच अनुदान प्राप्त होणे करिता मंजुरीस्तव मे. महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, धुळे शहर ग्राहक पाणी मीटर बसविण्याकामी 'सविस्तर प्रकल्प अहवाल' (DPR) तयार करण्यासाठी 'प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार' (PMC) म्हणून मे. यश इनोव्हेटिव्ह सोल्युशन्स LLP (YIS) यांना शासनमान्य दरानुसार नियुक्ती करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच याकामी शासनस्तरावरील विविध योजनेतून तथा जिल्हा नियोजन मंडळामार्फत निधी मागणी प्रस्ताव सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच सदर प्रकल्प अहवालास शासन मान्यता व निधी उपलब्धतेनंतर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारास शुल्क अनुज्ञेय राहील अशी स्पष्ट अट निविदा प्रक्रियेत व करारनाम्यात टाकण्यात यावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

**तद्नंतर मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या आदेशाने राष्ट्रगीत गायनानंतर बैठक समाप्त करण्यात आली.**

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**